FORM-1 A

N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No. ३६, वर्ष Year २०१८, दिनांक Date १६/११/२०१८

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र.अधिनियम १९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day शुक्रवार, तारीख पासून Date from १६/११/२०१८, वेळ Time ........, तारीख पर्यंत Date to ........, वेळ Time ........
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date ०६/११/२०१८, वेळ Time १४:०० वा.
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. २८/२०१८, तारीख Date १६/११/२०१८, वेळ Time १६:०० वा.

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. ........, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ........
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name जी/उत्तर विभाग बृहन्मुंबई महानगरपालिका माहिम फाटक जवळ, ठिकाणाचा नंबर No. if any ........, गल्ली Ward धारावी, रस्त्याचे नाव Name of road ९० फूट
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Distt. ........, राज्य State ........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Distt. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name जय, (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name चंद्रकांत लोखंडे
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age ३७ वर्षे, (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. ९८२०६४२०६
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........, दिल्याचा दिनांक Date of Issue ........, दिल्याचे ठिकाण Place of Issue ........, (f) व्यवसाय Occupation सरकारी कर्मचारी
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........
   (h) पत्ता Address : सोहम अपार्टमेंट, बि नं. ०६, रूम नं. ६, नवसमजना नालासोपारा (पू.) टाकीपाडा ........ महाराष्ट्र राज्य
   गल्ली Ward ........, सर्वे नं. ........, घर / नाव नंबर House/Name No. ........, फोन / मो. नंबर Phone/M. No. ........, पॅन नं. Pan No. ........, कार्ड नं. Card No. ........
   रस्त्याचे नाव Road ........, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........, गाव Village ........, पोस्ट Post ........, पो. स्टे. P. Stn. ........
   तालुका Taluka ........, जिल्हा Distt. ........, राज्य State ........, सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   रमेश शिवराम लांडे वय ४८ वर्षे, धंदा: नोकरी कनिष्ठ अवेक्षक, जी/उत्तर विभाग, घनकचरा व्यवस्थापन खाते, दादर, मुंबई, रा.ठि. ८/८६ म्युनिसिपल चाळ, डॉ. ई मोझेस रोड, वरळी नाका मुंबई-१८

फिर्यादी श्रीमती जया चंद्रकांत घेवडे वय-३७ वर्षे, धंदा-नोकरी (सफाई कामगार) बृहन्मुंबई महानगरपालिका, रा. ठि. सोहम संकुल, बि.नं.०७, रूम नं.०६ तळ मजला, नालासोपारा (प.), टाकीपाडा रोड, लोहार आळी, जि. पालघर, महाराष्ट्र राज्य, यांची सविस्तर फिर्याद स्वतंत्र कागदावर नोंद करण्यात आली असून तिच गुन्ह्याची प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(गणेश कानडे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई

जया चंद्रकांत घेवडे

Scanned with OKEN Scanner

फिर्याद दिनांक –१६/११/२०१९

श्रीमती जया चंद्रकांत घेवदे, वय ३७ वर्षे, धंदा– नोकरी, सफाई कामगार, रा.ठी – सोहम संकुलन अपार्टमेंट, बि.नं. ०७, रुम नं. ०६, तळमजला, टाकीपाडा रोड, लोहार आळे, नालासोपारा (प), जि.पालघर

———

मी वरीलप्रमाणे असुन नमुद पत्त्यावर माझ्या कुटूंबासमवेत रहावयास आहे. माझे पती महानगरपालिका, बृहन्मुंबई येथे सफाई कामगार म्हणून नोकरीस होते. त्यांचे सन २०१५ मध्ये निधन झाल्याने त्यांचे जागेवर अनुकंपा तत्वावर मी गेल्या चार वर्षापासुन सफाई कामगार म्हणून नोकरीस लागले आहे. सध्या मी जी/नॉर्थमध्ये माहिम फाटक चौकी येथे हजेरी पट क्र.१४ वर असुन कल्याणी हॉटेलच्या बाजुला, धारावी या ठिकाणी साफसफाई करून कचरा भरण्याचे काम करीत आहे. सदर कामातुन मिळणारे मासिक वेतनावर माझे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविते.

मी जी/नॉर्थमध्ये माहिम फाटक चौकी येथे दररोज सकाळी ०६:२० वा कामावर येवून तेथील कल्याणी हॉटेलच्या बाजुला, धारावी येथे साफसफाई करते. तेथील कचरा हा वाकुन भरावा लागत असल्याने ते कष्टाचे काम आहे. माझे एप्रिल २०१९मध्ये गर्भपिशवीचे ऑपरेशन झाल्याने डॉक्टरांनी मला हलके काम करण्याबाबत सल्ला दिला आहे. सध्या मी करीत असलेले काम हे खुप कष्टाचे असल्याने मला त्रास होत आहे. सध्या हजेरी पट क्र. १५ मधील एक महीला ही सेवानिवृत्त झाल्याने ती जे काम करीत होती ते कमी कष्टाचे आहे. म्हणुन मी आजारपणाबाबत माझे साहेब श्री तांबे यांना माहीती देवुन माझे प्रकृतीला त्रास होत असल्याने व डॉक्टरांनी मला कमी कष्टाचे काम करण्यासाठी सांगितल्याने सेवानिवृत्त झालेल्या हजेरी पट क्र १५ मधील महीलेच्या जागी माझी नेमणूक करणेबाबत श्री.तांबे साहेबांना अनेकवेळा तोंडी विनंती केली होती. त्यावेळी त्यांनी माझेकडे सदर ठिकाणी माझी नेमणूक करण्याकरीता २०,०००/– रु. ची लाचेची मागणी केली होती. माझेकडे ऐवढे पैसे नसल्याने मी जी/नॉर्थ, बीएमसी कार्यालय, दादर (प) येथील वरिष्ठांना विनंती करुन मला माहिम फाटक चौकी येथे हजेरी पट क्र. १५ मधील सेवानिवृत्त महीलेच्या जागी डयुटी देण्याबाबत जी/नॉर्थ बीएमसीचे कार्यालयातुन कार्यालयीन आदेश प्राप्त केले आहे.

सदर आदेश मी श्री. तांबे साहेब यांना दाखवुन विनंती केली असता त्यांनी सदरचे आदेश न जुमानता " तुम्हाला हजेरी पट क्र. १५ वर डयुटी बदलुन देण्याकरीता २०,०००/– रु. द्यावेच लागतील अन्यथा जेथे काम करीत आहात तेथेच काम करावे लागेल" असे सांगितले. परंतु श्री. तांबे साहेब यांना लाच देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक ०६/११/२०१९ रोजी दुपारी ३:०० वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे पो.नि. गणेश कानडे यांना भेटुन वर नमुद प्रमाणे सर्व हकीगत सांगितली. त्यानंतर पो.नि. कानडे यांनी मला लेखी तक्रार लिहुन देण्यास सांगितली परंतु माझे शिक्षण कमी असल्याने मला मराठी वाचता येते, परंतु नीट लिहिता येत नसल्याने मी विनंती केल्यावरुन पो.नि. कानडे यांनी माझा तक्रारअर्ज संगणकावर टंकलिखित केला व तो तक्रारअर्ज मी वाचुन पाहिले असता माझे सांगणेप्रमाणे बरोबर असल्याने सदर तक्रारअर्जावर मी स्वाक्षरी करुन त्याचेकडे दिला. तसेच श्री तांबे साहेब हे सकाळी भेटु शकतात म्हणुन मला दिनांक ०७/११/१९ रोजी सकाळी ०५:३०वाजता लाप्रवि कार्यालयात बोलाविले तसेच सदर तक्रारअर्जाबाबत दोन सरकारी पंचासमक्ष पडताळणी कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी मला सांगितले.

Scanned with OKEN Scanner

त्यानुसार दिनांक ०७/११/१९रोजी सकाळी ०५:३०वाजता मी तसेच दोन सरकारी पंच तसेच पोलीस पथक हे लाप्रवि कार्यालयात हजर झाले असता पो.नि. कानडे यांनी पंचाना तक्रारअर्जाबाबत माहीती देवुन त्यांची स्वाक्षरी त्यावर घेवुन तो तक्रारअर्ज स्वत:कडे ठेवला त्यानंतर सदर माझे तक्रारअर्जाबाबत दोन सरकारी पंचासमक्ष दिनांक ०७/११/२०१९ रोजी पडताळणी करण्यासाठी लोकसवक तांबे यांचे कार्यालयात भेटण्यास पंचासमक्ष गेलो असता लोकसेवक श्री. रमेश तांबे यांनी माझेकडे रुपये १५,०००/— लाचेची मागणी केली व त्यांना शुक्रवारी साप्ताहिक सुटी असल्याने शनिवारी पैसे घेवून येणे बाबत सांगितले.

त्यानंतर पो.नि. कानडे यांना लोकसेवक हे लाचेची मागणी केल्याची व ती स्विकारणार असल्याची खात्री झाल्याने मला शनिवार दिनांक ०९/११/२०१९ रोजी सकाळी ०५:३० वा. ला.प्र.वि. वरळी, मुंबई या ठिकाणी येण्यास सांगितले. त्यानुसार दिनांक ०९/११/२०१९ रोजी मी सकाळी ०५:३० वा. ला.प्र.वि. वरळी, मुंबई येथे आले असता पो.नि. कानडे हे दोन पंच व पडताळणी पथक हजर होते.त्यानंतर पो.नि कानडे यांनी सापळा कारवाई चे आयोजन केले. मला लोकसेवक तांबे यांचे कार्यालयात पंचासह गेले असता, त्याचे कार्यालयात श्री ताबे साहेब दिसुन आले नाही. म्हणुन मी लोकसेवक श्री.तांबे यांचेबाबत चौकशी केली असता, लोकसेवक श्री.तांबे हे रजेवर असल्याचे समजले. म्हणुन मी श्री तांबे यांच्या मोबाईलवर संपर्क साधला असता ते रजेवर असुन सोमवार किंवा मंगळवारी हजर होणार असल्याचे सांगुन तेव्हा भेटुन बोलु. असे सांगितले. सदरची बाब पोनि कानडे यांना सांगितले असता त्यांनी सापळा कारवाई स्थगित करून सांपळा काढुन घेतला.

त्यानंतर दिनांक १२/११/२०१९ रोजी मी सकाळी ०५:३० वा. ला.प्र.वि. वरळी, मुंबई येथे आले असता पो.नि.कानडे हे दोन पंच व पडताळणी पथक हजर होते.त्यानंतर पो.नि कानडे यांनी सापळा कारवाई चे आयोजन केले. मला लोकसेवक तांबे यांचे कार्यालयात पंचासह गेले असता, त्याचे कार्यालयात श्री ताबे साहेब दिसुन आले नाही. म्हणुन मी लोकसेवक श्री.तांबे यांचेबाबत चौकशी केली असता, लोकसेवक श्री. तांबे हे रजेवर असल्याचे समजले. त्यानंतर मी श्री तांबे यांना फोन लावला असता त्यांनी तो उचलला परंतु पलीकडून त्यांचा आवाज आला नाही. सदरची हकीकत मी पो.नि कानडे यांना सांगितल्यानंतर सापळा पथकास काही तास थांबण्यास सांगितले. त्यानंतर पो.नि. कानडे यांनी सापळा कारवाई स्थगित करुन सापळा काढुन घेण्यात आला.

दिनांक १३/११/२०१९ रोजी रात्रौ ०८.१० वा.चे सुमारास लोकसेवक श्री.ताबें साहेबांना मी एक दिवस रजेसाठी फोन केला होता. त्यावेळी श्री.तांबे साहेब यांनी सांगितले की, एका दिवसाच्या रजेकरीता माझे सहीची आवश्यकता नाही, तुम्ही दुसऱ्याकडुन रजा मंजुर करून घ्या.त्यानंतर मी माझे कामाविषयी विचारले असता, त्यांनी शनिवार दिनांक १६/११/२०१९ रोजी येणार असुन त्यावेळी भेटु. असे सांगितले सदरचा फोन झालेनंतर मी पो.नि कानडे यांना मोबाईलवर संपर्क साधुन लोकसेवक ताबें साहेब यांनी शनिवार दिनांक १६/११/२०१९ रोजी सकाळी भेटणार असल्याचे सांगितले.

दिनांक १६/११/२०१९ रोजी मी सकाळी ०५:३० वा. ला.प्र.वि. वरळी, मुंबई येथे आले असता पो.नि.कानडे हे दोन पंच व सापळा कारवाई करीता हजर होते. त्यानंतर पो.नि कानडे यांनी सापळा कारवाई चे आयोजन केले. पो.नि कानडे यांनी माझेकडे लोकसेवकाने मागणी केलेल्या लाचेची रक्कम मागितली असता, मी माझे बचतीतील रू.१५,०००/— पो.नि कानडे यांना दिले. त्यावेळी पोनि कानडे यांनी त्यांच्या मोबाईल द्वारे सदरच्या नोटांचे फोटो काढले त्यानंतर पोनि कानडे यांच्या सुचनेवरून एका अंमलदाराने लाचेच्या रक्कमेला पंचासमक्ष कापसाच्या बोळयाने ॲन्थ्रासीन पावडर लावली. सदरच्या भारतीय चलनी नोटा हया घडी करून रू.१५०००/— माझे पर्समध्ये ठेवली. त्यानंतर सापळा कारवाई करण्याचे आयोजन केले.

Scanned with OKEN Scanner

त्यानंतर पो.नि. कानडे यांनी सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या खबरदारीबाबत आवश्यक त्या सुचना देवून डिजीटल व्हाईस रेकार्डर चालु करून महिला पंच श्रीमती मीना कोकणी यांचे समक्ष मपोशि पडेलकर यांच्याकडे देवुन पोनि कानडे यांच्या सुचनेप्रमाणे त्यांनी माझे आतील ब्लाउसच्या आतील भागामध्ये लावला व पंच श्रीमती कोकणी यास माझे बरोबर काही अंतर ठेवुन जाण्यास सांगितले. मी जी/उत्तर वार्ड, माहिम फाटक, बीट मैदान २ चौकी,धारावी येथे भेट घेतली असता मी माझे कामाबाबत श्री तांबें यांच्याकडे चर्चा केली असता त्यांनी इशा—याने पैशाची मागणी केली असता मी लगेचच माझे पर्स मधील लाचेची रक्कम उजव्या हाताने काढुन ती लोकसेवक रमेश तांबे यांचे हातात दिली असता, लोकसेवक रमेश तांबे यांनी पैसे मोजले असता ते रू.१४,५००/—असल्याचे सांगितले. व त्यांनी मला सदरचे पैसे मोजण्यास सांगितले. म्हणुन मी सुध्दा पैसे मोजुन पाहिले असता सदरची रक्कम रू. १४,५००/— होती. म्हणुन त्यांना सदरची रक्कम देवुन 'नंतर बघेन' असे सांगितले. लोकसेवक श्री.तांबे साहेब यांनी घेतलेले पैसे त्याचेकडे असलेल्या काळया रंगाच्या बॅगेत ठेवले.

लोकसेवक श्री.रमेश शिवराम तांबे यांनी लाचेची रक्कम घेतल्यानंतर मी कार्यालयातुन बाहेर येवुन पुर्वनियोजीत ठरलेल्या इशा—याप्रमाणे मी साडीचा पदर डोक्यावर घेवुन सापळा पथकास लोकसेवकाने लाचेची रक्कम घेण्याबाबत इशारा केला असता, सापळा पथक हे पंचासह लोकसेवकाच्या कार्यालयात येवुन लोकसेवक तांबे यास ताब्यात घेतले. लाचेची रक्कम पंचासमक्ष सापळा पथकाने लोकसेवकाच्या बॅगेतुन ताब्यात घेतली. व पुढील कार्यवाहीसाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वरळी मुंबई येथे घेवुन आले.

माझे लोकसेवक रमेश शिवराम तांबे यांच्याशी कोणतेही पूर्व वैमनस्य नसून कोणताही आर्थिक व्यवहार नाही. लोकसेवक रमेश तांबे यांनी मला कमी कष्टाचे काम देण्याकरीता माझेकडे रू.२०,०००/— इतक्या रक्कमेची मागणी केली. व त्यानंतर ०७/११/२०१९ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक रमेश तांबे यांनी तडजोडी अंती रू.१५,०००/— लाचेची मागणी केली व आज दिनांक १६/११/२०१९ रोजी लोकसेवक रमेश तांबे यांनी रू. १४,५००/—स्विकारल्यानंतर पोलीसांनी रंगेहाथ पकडले म्हणुन माझी त्यांचेविरुध्द फिर्याद असून योग्य ती कायदेशिर कारवाई होण्यास विनंती आहे.

माझा जबाब संगणकावर मराठीत संगणीकृत केला असून तो मी वाचून पाहिला असता तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

(गणेश कानडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

जया हेवाळे

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9) चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

........................................................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ........ रोख रु. १८,५००/-
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ........
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपी लोकसेवक यांनी त्यांचे हाताखाली काम करणार फिर्यादी यांना कमी कष्टाचे काम देण्याकरीता अप्रामाणिक रुपये २०,०००/- इतक्या लाचेची मागणी करुन तडजोडी अंती रुपये १५,०००/- घेण्याचे मान्य केले. तसेच रुपये १८,५००/- इतक्या रक्कमेच्या लाचेचा गैरलाभ रक्कम स्विकारला म्हणून भ्र. प्र. अधिनियम १९८८ कलम ७ अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही :-** 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

गणेश कनडे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

........................................................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ........ Rank........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P.S ........, District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name गणेश कनडे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड. क्र. ला.प्र.वि. मुंबई
Posting
Code No. of I. O. ........

14. जया चंद्रकांत खेवदे
तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

प्रत मिळाली
जया चंद्रकांत खेवदे

ANTI CORRUPTION BUREAU MUMBAI

Scanned with OKEN Scanner